# जनजागृतीअभावी सायबर क्राइममध्ये वाढ

## क्विक हिलचे अजय शिर्के : महाकवी कालिदास कलामंदिरात मार्गदर्शन शिबिर

सकाळ वृत्तसेवा



अजय शिर्के

नाशिक, ता. २१ : आज प्रत्येक जण इंटरनेटच्या मदतीने मोबाईल आणि कॉम्प्युटरच्या माध्यमातून जगाशी जोडला गेला आहे. इंटरनेटचे फायदे असून, त्याचप्रमाणे तोटेही आहेत. इंटरनेटवरून माहिती, काही वस्तू किंवा माहिती शेअर करताना आवश्यक माहिती न घेतल्याने फसगत होते. जनजागृतीअभावी सायबर क्राइममध्ये वाढ होत आहे. त्यासाठी सायबर सिक्युरिटी फार महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन क्विक हिल कंपनीचे सीएसआर हेड अजय शिर्के यांनी केले.

एचपीटी कला व आरवायके विज्ञान महाविद्यालय आणि क्विक हिलतर्फे कालिदास कलामंदिरात 'नेट विश्वातील धोके आणि घ्यावयाची काळजी' या विषयावर झालेल्या मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते. गंगापूरचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र कुटे, प्राचार्य सूर्यवंशी आदी प्रमुख पाहुणे होते.

श्री. शिर्के म्हणाले, ''आज वर्षाला ३३ कोटी व्हायरस इंटरनेटच्या माध्यमातून येत असून, त्यापैकी १७ कोटी व्हायरस क्विक हिलच्या माध्यमातून तपासले जात आहेत. या सर्वांपासून वाचण्यासाठी सायबर सिक्युरिटी फार मोठी गरजेची आहे. आगामी काळात सायबर सिक्युरिटी प्रत्येक क्षेत्रात लागणार आहे. यामुळे या क्षेत्रात फार संधी आहेत. या क्षेत्रात येण्यापूर्वी इंटरनेटबद्दल माहितीचे वाचन करण्याची गरज आहे.''

वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र कुटे म्हणाले, ''मानवाच्या प्रगतीप्रमाणेच सायबर क्राइमची प्रगती झाली आहे. यात दुसऱ्याच्या खात्याची माहिती मिळवून आर्थिक गुन्हे करणे, धार्मिक भावना दुखाविणे, दुसऱ्याच्या नावाने संदेश पाठविणे, असे अनेक प्रकार होत आहेत. प्रत्येकाने मोबाईल वापरताना तो क्षणभरही दुसरीकडे ठेवू नये. कारण, पहिला शत्रू आपल्याच जवळचा मित्र असल्याचे अनेक गुन्ह्यांतून उघड झाले आहे. फेसबुकवरूनही आपली माहिती ही कळत नकळत पूर्ण जगात पोचते. इंटरनेट वापरताना सूचनांचे पालन करा. जेणेकरून फसवणूक होणार नाही. कोणालाही आपली माहिती देऊ नका. शिवाय नोकरी, ॲप किंवा सॉफ्टवेअर अपडेट करताना आवश्यक काळजी घ्यावी.''

केटीएचएम महाविद्यालय, सिलिकॉन व्हॅली, लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय, अशोका सेंटर फॉर बिझनेस, आर्ट, सायन्स ॲण्ड कॉमर्स महाविद्यालय, सुरगाणा, बीआरटी आर्ट ॲण्ड सायन्स महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.



**महाकवी कालिदास कलामंदिर : एचपीटी, आरवायके महाविद्यालय व क्विक हिलतर्फे गुरुवारी झालेल्या कार्यशाळेस उपस्थित विद्यार्थी व शिक्षक.**